# औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,औरंगाबाद

दिनांक ७/३/२००३ रोजी दुपारी ३.०० वाजता झालेल्या औरंगाबाद मंडळाच्या १२५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत

सदर बैठकीस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १.मा.श्री.के.बी.गवळी | मुख्य अधिकारी तथा उपसभापती औरंगाबाद मंडळ |
| २.मा.श्री.मकरंद सावे | सदस्य औरंगाबाद मंडळ |
| ३.मा.श्री.बबनराव देशमुख | सदस्य औरंगाबाद मंडळ |
| ४.मा.श्री. ॲड जे.पी.पाटील | सदस्य औरंगाबाद मंडळ |
| ५.मा.श्री.साहेबराव खरात | सदस्य औरंगाबाद मंडळ |
| ६.मा.श्री.संजय वाघचौरे | सदस्य औरंगाबाद मंडळ |
| ७.मा. श्री. वामनराव राऊत | सदस्य औरंगाबाद मंडळ |
| ८.मा.श्री.राजेश्वर चव्हाण | सदस्य औरंगाबाद मंडळ |
| ९.मा. श्री.विश्वासराव उपासे | सदस्य औरंगाबाद मंडळ |
| १०.मा.डॉ.डी .डी.शिंदे | सदस्य औरंगाबादमंडळ |
| ११.मा.श्री चॉदपाशा इनामदार | सदस्य औरंगाबाद मंडळ |
| १२.मा.श्री.शेख मुदस्सीर, सहायक नगररचनाकार, उपसंचालक नगररचना याचे प्रतिनिधी | सदस्य प्रतिनिधी |
| १३. मा.श्री.सिंकदर अली, कार्यकारी आभियंता मा.आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांचे प्रतिनिधी | सदस्य प्रतिनिधी |

मंडळाच्या १२५ व्या बैठकीचे कामकाज सुरु होण्यापुर्वी मंडळाचे सदस्य मा. श्री.मकंरद सावे यांनी शोक प्रस्ताव मांडला की, भारताचे माजी गृहमंत्री व कॉग्रेसचे जेष्ठ नेते मा.खा. श्री. शंकरराव चव्हाण यांच्या सुविध पत्नी तसेच महाराष्ट्र राज्याचे परिवहन मंत्री मा.ना.श्री.अशोकरावजी चव्हाण यांच्या मातोश्री श्रीमती कुसुमताई चव्हाण याचे दुःखद निधन झाल्यामुळे त्यांना २ मिनिटे सभागृहात स्तब्धत पाळुन ' श्रध्दांजली ' वाहण्याचा प्रस्ताव मांडला या प्रस्तावास मंडळाचे मा. सदस्य श्री.इनामदार यांनी अनुमोदन दिले व सभागृहात २ मिनिटे स्तब्धता पाळुन कै.श्रीमती कुसुमताई चव्हाण यांना ' श्रध्दांजली ' वाहण्यांत आली. मंडळाचे सदस्य, मा.खा.श्री शंकरराव चव्हाणसाहेब व मा.ना. श्री.अशोकरावजी चव्हाणसाहेब परिवहन मंत्री महाराष्ट्र राज्य यांच दुःखात सामील असल्याबद्यल तसेच मंडळातर्फे मा. सभापती औरंगाबाद मंडळयांचे स्वाक्षरीने पाठविण्यांत यावे असे मंडळाने सर्वानुमते ठरविले.

उपरोक्त प्रमाणे श्रध्दांजली वाहिल्यानंतर मंडळाच्या १२५ व्या बैठकीस उपस्थित असलेल्या पदाधिकाऱ्यांचे मंडळाचे मुख्य अधिकारी यानी स्वागत केले. मुख्य अधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी बैठकीत सांगितले की, कांही अपरिहार्य कारणास्तव मा.सभापती बैठकीस उपस्थित राहु शकत नाही असे कळविले आहे व बैठक मुख्य अधिकारी औरंगाबाद मडळ यांचे अध्यक्षतेखाली घेण्यास कळविलेले असल्याने मुख्य अधिकारी तथा उपसभापती औरंगाबाद मंडळ यांचे अध्यक्षतेखाली बैठकी घेण्यांत येत आहे असे मुख्य अधिकारी यांनी सांगितले .

बैठकीचे पटलावरील विषयानुसार कामकाज सुरु होण्यापुर्वी मुख्य अधिकारी यांनी सभागृहास माहिती दिली की,चालु वर्ष हे 'म्हाडाचे रौप्य महोत्सव वर्ष ' म्हणून साजरे करण्याचे प्राधिकरणाचे आदेश आहेत. व त्यानुसार या रौप्य महोत्सवी वर्षामुळे म्हाडाचे सर्व पदाधिकारी,अधिकारी व कर्मचारी याना एक सोन्याचे मुद्रा भेट म्हणून देण्याचे ठरविल्यानुसार मंडळाच्या मा. सदस्यांना बैठकीत सोन्याचे नाणे भेट म्हणून देण्यात आले . त्यानंतर मुख्य अधिकारी यांनी अशीही माहिती दिली की, हे वर्ष रौप्य महोत्सवी वर्ष असल्यामुळे त्यानिमित्त या वर्षात म्हाडाच्या योजनेची माहिती ग्रामीण भागातील जनतेपर्यन्त पोहोचविण्यासाठी कारवाई करणे,विविध खेळांचे/सांस्कृतिक स्पर्धा आयोजित करणे इ. कार्यक्रम राबवावयाचे आहेत व कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी विभागीय पातळीवर रौप्य महोत्सवी वर्षा निमित्त एक सुकाणू समिती स्थापन करावयाची आहे व अशा समितीच्या बैठका घेऊन त्यामध्ये ठरविल्यापमाणे कार्यक्रम साजरे करावयाचे आहेत त्यासाठी प्राधिकरणाने रु २५०००/-एवढा निधी खर्च करण्यासाठी मंजूरी दिलेली आहे. याबाबत मंडळाचे सदस्य मा.श्री. इनामदार यांनी सांगितले की,मुंबई येथील मंडळाना जेवढा निधी रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त खर्चासाठी मिळाला आहे तेवढा निधी औरंगाबाद मंडळास मिळावा असे मंडळाचे वतीने प्राधिकरणास पत्र लिहावे यास मंडळाचे सर्व मा. सदस्यांनी सहमती दर्शविली व वरीलप्रमाणे रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त खर्चासाठी मुंबई येथील मंडळाप्रमाणे निधी मिळण्यासाठी पत्र लिहावे असे बैठकीत ठरले. यावर मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, सदर बाबतीत प्राधिकरणाडे प्रस्ताव पाठविण्यात येईल.

वरीलप्रमाणे चर्चा झाल्यानंतर पटलावरील विषयावर कामकाजास सुरुवात झाली.

विषय क्र:- १ औरंगाबाद मंडळाच्या दिनांक १०/१/२००३ रोजी झालेल्या १२४ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणेबाबत.

मंडळाच्या दिनांक १०/१/२००३ रोजी झालेल्या १२४ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांताविषयी (बैठकीमध्ये झालेल्या ठरावाबाबतची माहिती )विस्तृत माहिती मुख्य अधिकारी यांनी मंडळास दिली. मंडळाने १२४ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत सर्वानुमते मान्य केला व मंडळाने खालील प्रमाणे निर्णय घेतला की,

ठराव क्रमांक ७४६:-

दिनांक १०/१/२००३ रोजी झालेल्या १२४ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्यांत आला.

विषय क्रमांक २:- अध्यक्ष ज्ञानविकास शिक्षण संस्था तुळजापूर यांना वाटप करण्यंत आलेल्या गाळयांचे भाडेखरेदी हप्ते वरील व्याजदरात सुट मिळणेबाबत.

या विषया बाबत मुख्य अधिकारी यांनी मंडळास माहिती दिली की, ज्ञानविकास शिक्षण संस्था तुळजापुर यांना तुळजापूर येथे मंडळाच्या आर्थिक दृष्टया दुर्बल घटक योजनेतील एकुण १८ गाळे भाडेखरेदी

तत्वावर वाटप केलेले आहेत व त्यांच्याकडे मंडळाचे जवळपास २.०० लाख रुपये थकबाकी आहेत. मंडळाने त्यांना वेळोवेळी नोटीसा बजावुनही ते थकबाकी भरत नाहीत.परिणामी हप्त्यावरील व्याजामुळे/सरचार्जमुळे थकबाकीची रक्कम त्यांच्याकडे मोठया प्रमाणात थकलेली आहे.उपरात्त संस्थेने थकीत रक्कमेवर व्याजदरात सुठ मिळावी म्हणून मंडळाकडे विनंती केली आहे तसेच मंडळाचे मा. सदस्य श्री उपासे यांनीही संस्थेसाठी व्याज व सरचार्ज माफ करुन देऊन व त्यांना नव्याने योग्य प्रकारे हप्ते पाडुन रक्कम भरण्याची सवलत द्यावी असे दिनांक १/२/२००३ च्यापत्रान्वये मुख्य अधिकारी यांना कळविले आहे. त्यानुसार सदर बाब मंडळाच्या विचारास्तव व निर्णयास्तव ठेवली आहे. मुख्य अधिकारी यांनी मंडळास अशीही माहिती दिली की, प्राधिकरणाचे प्रचलित धोरणानुसार व नियमानुसार थकीत रक्कमकेवरील व्याज/सरचार्ज हा मंडळ स्तरावर माफ करता येत नाही .तसेच एका प्रकरणात सवलत देणे हे उचित होत नाही. कारण तशा प्रकारची सवलत इतर प्रकरणात देणे हे क्रमप्राप्त होईल . म्हणून याबाबत प्रकरण तपासुन प्राधिरणाकडे प्रस्ताव पाठवुन मंजूरी प्राप्त करुन घेऊलच नंतर पुढील कारवाई करणे शक्य होईल. तसेच पुढे असेही नमुद केले की,दरम्यानच्या कालावधीत वसुलीची रितसर कार्यवाही चालु ठेवावी लागेल. याबाबतीत मंडळाचे मा. सदस्य डॉ.श्री. शिंदे यांनी प्रतिपादन केले की,उस्मानाबाद यथील मंडळाची वसुली ही मंडळाचे मा. सदस्य श्री.उपासे यांचे मार्गदर्शन व सहकार्य घेऊन करावी तसेच ज्ञानविकास शिक्षण संस्था तुळजापूर यांना गाळयांचे भाडेखरेदी हप्तेवरील सुट/विलंब आकारा वरील सुट देण्याबाबत नियमानुसार जे काही करणे शक्य होईल व त्यासाठी आवश्यक ती मंजूरी प्राधिकरणाकडुन घेऊन कारवाई करावी. उपरोक्त चर्चेअंती मंडळाने याविषयी सर्वानुमते खालील प्रमाणे निर्णय घेतला की,

ठराव क्र ७४७:-

ज्ञानविकास शिक्षणसंस्था,तुळजापुर यांचेकडील मंडळाचे थकीत रक्कमेवरील व्याज दरात सुट/विलंव आकारात सुट देणेबाबतचा सविस्तर प्रस्ताव प्राधिकरणास पाठविण्यांत यावा व प्राधिकरणाची मंजूरी प्राप्त झाल्यानंतर योग्य ती कारवाई करण्यांत यावी दरम्यानच्या काळात वसुलीची कार्यवाही चालु ठेवावी.या ठरावाच्या स्थायी करणाची वाट न पाहता कारवाई करण्यांत यावी.

विषय क्रमांक ३:-सर्व्हे क्रमांक १४ भाग सेलु जि.परभणी येथील विकसीत
भूखड योजनेतील भूखंडाचे वाटप सुलभ हप्त्यात करणेबाबत.

या विषयाबाबतची माहिती मुख्य अधिकारी यांनी मंडळास दिली की, मंडळाचे उच्च,मध्यम व अल्प उत्पन्नगट योजनेचे एकुण १७२ भूखंड सेलु येथे वाटपास उपलब्ध आहेत. सदर रिक्त भूखंडांसाठी वेळोवेळी जाहिरात दिली असता त्यास काहीच मागणी मिळत नाही परिणामी भूखंड वाटपा अभावी रिक्त पडुन आहेत. या भूखंडास नगर परिषद सेलु येथील कर्मचाऱ्यांची मागणी आलेली आहे व नगर परिषद सेलुने देखील त्यांचे कर्मचाऱ्यांस भूखंड देण्याची मागणी केली आहे व भूखंडांचे किंमतीचे हप्ते पाडुन किंमत भरण्यास सवलत देण्याचीही विनंती केली आहे व नगरपरिषद हप्ते कर्मचाऱ्यांकडुन वसुल करुन परतफेड

करण्याची हमी घेत आहे. म्हणून सेलु येथील भूखंड नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांस भूखंडांच्या किंमतीचे ६० हप्ते पाडुन(५ वर्षांच्या परतफेडीच्या मुदतीवर) कर्मचाऱ्यांना वाटप केल्यास मंडळाचे सर्व भूखंड विक्री होतील व मंडळाच्या योजनेत अडकुन पडलेला निधी मोकळा होईल अशी माहिती मुख्य अधिकारी यांनी मंडळास दिली. यावर मंडळाचे सर्व मा. सदस्यांनी बैठकीत सर्वानुमते सांगितले की, मंडळाचे रिक्त पडलेले भूखंड हे नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांना भूखंडांच्या किंमतीचे ५ वर्षात ( ६० हप्ते) हप्ते पाडुन किंमत वसुल करण्याच्या अटीवर व नगरपषिदेच्या कर्मचाऱ्यांकडुन भूखंडांच्या किंमतीचे हप्ते वसुल करण्याची हमी नगरपरिषद सेलुने घेण्याच्या अटीवर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. जेणे करुन मंडळाचे बऱ्याच वर्षापासुन रिक्त पडलेले भूखंड वाटप होतील व मंडळाचा अडकून पडलेला निधी मोकळा होईल. म्हणून सदर प्रस्तावास प्राधिकरणाची मंजूरी घेऊन पुढील कारवाई करण्यांत यावी व उपरोक्त चर्चेप्रमाणे मंडळाने खालील प्रमाणे निर्णय घेतला की,

ठराव क्रमांक ७४८:-

सेलु येथील उच्च,मध्यम व अल्प उत्पन्न गटातील अनुक्रमे १२ भूखंड,२४ भूखंड व १३६ भूखंड असे एकुण १७२ भूखंड सेलु नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांना भूखंडांच्या किंमतीचे ६० हप्त्यात ५ वर्षाचे परतफेड करण्याचे हप्ते पाडुन देऊन व भूखंडांच्या मासिक हप्त्याची वसुली करण्याची जबाबदारी नगरपरिषदेने घेण्याच्या अटीवर मान्यता देण्यांत येत आहे. याप्रस्तावास प्राधिकरणाची मंजूरी मिळण्यासाठी, मंडळाच्या शिफारशसह प्रस्ताव प्राधिकरणाकडे पाठविण्यांत यावा व प्रधिकरणाची मंजूरी प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करावी.सदर ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता कारवाई करण्यांत यावी.

विषय क्र:- ४ राष्ट्रीय झोपडपट्टी सुधारणा योजने अंतर्गत लातूर येथील घोषित झोपडपट्टयातील सामाजिक सुविधां अंतर्गत मध्यवर्ती जागी एक दवाखाना (ज्यात बाल आरोग्य लसीकरण,प्राथमिक आरोग्य सेवा )बांधण्याच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यताप्रदान करणेबाबत .

या विषयाच्या बाब टिप्पणीबाबत सविस्तर माहिती मुख्य अधिकारी यांनी मंडळास दिली. मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, या विषयीच्या बाबटिप्पणीत नमुद केल्याप्रमाणे लातुर येथे सामाजिक सुविधेमधुन एकत्रित स्वरुपात झोपडपट्टीधारकांना सोईसाठी व सुविधेसाठी एक दवाखाना बांधणे व त्याद्वारे सर्व प्राथमिक आरोग्य सेवा जसे बाल आरोग्य केंद्र,प्राथमिक आरोग्य केंद्र,लसिकरण सेवा इ. उपलब्ध करुन देता येतील यादृष्टीने एक दवाखाना बांधण्याचे नगरपरिषदेने प्रस्तावित केले आहे. दवाखाना उभारण्याच्या खर्चाचा काही भाग नगरपरिषद लातूरने त्यांचे स्वतःच्या निधीतुन करावयाचा आहे व कांही भाग हा गलिच्छवस्ती सुधार कार्यक्रमा अंतर्गत सामाजिक सविधांसाठी असणाऱ्या तरतुदीमधून करावयाचा आहे. सर्व घोषित २४ झोपडपट्टीतील १९९१ ची लोकसंख्या विचारात घेऊन शासनाच्या दिनांक १/१०/९९ च्या आदेशानुसार सर्व झोपडपट्टीसाठी सामाईकरित्या उपरोक्त प्रमाणे सामाजिक सुविधा पुरविता येईल

किंवा कसे याबाबत शासनाकडुन मार्गदर्शन मागविले असता,कक्ष अधिकारी,गृहनिर्माण विभाग मंत्रालय मुंबई यांनी त्यांचे पत्र क्रमांक बैठक/२००२/प्र.क्र ४२७/झोपसु-१ दि. ३/२/२००३ अन्वये लातुर नगरपरिषदेने सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता दिली असल्यामुळे राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधारणा कार्यक्रमाअंतर्गत लातुर नगरपरिषदेस उपलब्ध असणाऱ्या सामाजिक सुविधेच्या तरतुदी मधुन येत्या २ ते ३ वर्षामध्ये दरडोई रु. २००/- पैकी रु. १२०/- या दवाखाना उभारणीच्या कामासाठी खर्च करण्यासाठी शासनाने मान्यता दिलेली आहे, अशी माहिती मुख्य अधिकारी यांनी बैठकीत दिली.मुख्य अधिकारी यांनी असेही सांगितले की,लातूर शहरात एकुण २४ घोषित झोपडपट्टया असुन सर्व झोपडपट्टयांमध्ये एकुण लोकसंख्या १३०३०३ एवढी आहे. त्यामधुन उस्मानपुरा व वडारवाडा या दोन झोपडपट्टयांचे १९९१ प्रमाणेची लोकसंख्या १३५०८ विचारात घेऊन सामाजिक सुविधेसाठी रु. २००८०७७/- एवढया रकमेस प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली असल्याने उर्वरीत २२ झोपडपट्टयांची लोकसंख्या १,१६,७९५ लक्षात घेता प्रतिपुर्तीसाठी रु. १,४०,१५,४००/-एवढीच पात्र ठरते. प्रस्तुत दवराखान्याच्या उभारणीसाठी लातुर नगर परिषदेने लेबर कॉलनी येथे उपलब्ध असलेल्या जमिनीवर प्रस्तावित केली असुन अंदाजपत्रकीय रक्कम रुपये २,२६,९५,७१६/- पैकी रु.१,४०,१५,४००/- पर्यन्तची रक्कम निधीच्या उपलब्धतेनुसार प्रतिपुर्तीसाठी पात्र राहील व दवाखान्याच्या बांधण्याच्या कामसाठीची प्रशासकीय मान्यता बाब टिप्पणीत नमुद केल्याप्रमाणे विशिष्ट अटीवर देण्यासाठी बाब मंडळाच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर केली आहे. यावर मंडळाचे सर्व मा. सदस्य यांनी प्रतिपादन केले की, बाब टिप्पणीत नमुद केल्याप्रमाणे नगर परिषद लातुरने प्रस्तावीत केल्यानुसार व शासनाचे गृहनिर्माण विभागाने मंजुरी दिल्यानुसार उपरोक्त नमुद केल्यापमाणे लातुर येथे एक दवाखाना बांधण्यासाठीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यास हरकत नाही व त्यासाठी येणाऱ्या खर्चास राष्ट्रीय गलिच्छवस्ती सुधार कार्यक्रमाअंतर्गत तरतुदीमधुन कांही भाग म्हणजे रु. १२०/- दरडोईप्रमाणे व नगरपरिषद लातुरच्या स्वतःच्या निधीमधुन कांही भाग म्हणजे रु. ८०/- दरडोई अशा आर्थिक तरतुदीतुन नगरपरिषदेने करण्यास मान्यता देण्यात येते. त्याप्रमाणे सादर केलेल्या दवाखान्याचे अंदाजपत्रकीय खर्चाची रक्कम रुपये २,२६,९५,७१६/- पैकी फक्त रुपये १,४०,१५,४००/-च्या हद्दी पर्यन्तच्या रक्कमेच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यासाठी आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता करुन घेऊन बाब टिप्पणीत नमुद केलेल्या अटींच्या अधिन राहुन देण्यांत येत आहे असे मंडळाने सागितले.

उपरोक्त प्रमाणे चर्चा झाल्यानंतर मंडळाने खालील प्रमाणे एकमताने निर्णय घेतला की,

ठराव क्रमांक ७४९:-

राष्ट्रीय झोपडपट्टी सुधार कार्यक्रम योजने अंतर्गत लातुर येथील घोषित झोपडपट्टीतील सामाजिक सुविधां अंतर्गत मध्यवर्ती जागेवर एक दवाखाना बांधण्याचे (ज्यात बाल आरोग्य,लसीकरण,प्राथमिक आरोग्य सेवा इ.) प्रस्तावातील नकाशे व अंदाजपत्रकीय रक्कम रुपये २,२६,९५,७१६/- (दोन काटी सव्वीस लाख पंच्याण्णव हजार सातशे सोळा फक्त )ला बाबटिप्पणीत नमुद

केलेल्या अटीस आधीन राहुन प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यांत येत आहे. नगर परिषदेने दाखल केलेल्या दवाखान्याचे अंदाजपत्रकीय रक्कम रु.२२६९५७१६/- पैकी फक्त रु.१४०१५४००/- (एक कोटी चाळीस लाख पंधराहजार चारशे फक्त )च्या हद्दीपर्यन्त रक्कम निधीच्या उपलब्धतेनुसार अर्थसंकलपीय तरतुदीच्या अधिन राहुन नियमानुसार प्रतिपुर्ती करण्यास हरकत नाही. स्थायी करणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असाही मंडळाने निर्णय घेतला.

मा. सभापती यांचे परवानगीने आयत्या वेळेस येणारे विषय.

विषय क्र:- ५ सिटीएस क्र.२०७१९ गृहनिर्माण भवनाजवळ औरंगाबाद येथील जमिनीवरील योजनेबाबत.

सदर विषयाच्या बाब टिप्पणी बाबतची माहिती मुख्य अधिकारी यांनी मंडळास दिली . गृहनिर्माण भवनाजवळील सिटीएस क्र. २०७१९ येथील जमिनीमधील मंडळाच्या ताब्यातील ४००० चौमी. क्षेत्रावर व्यापारी संकुल बांधण्याचे प्रस्तावित होते. परंतु अशा संकुलास जाहिरात दिली असता अल्प प्रतिसाद प्राप्त झाला.तद्नंतर उक्त जागेवरील सध्यास्थित असलेल्या इमारती पाडुन त्या ठिकाणी एकत्रितपणे अद्यावत व्यापारी संकुल बांधावे व उर्वरीत मागील क्षेत्रात उच्च उत्पन्न गट योजना राववावी असे मंडळाने ठरविले होते. त्यास प्राधिरणाची मंजूरी घ्यावी लागेल. तसेच भूखंडावर सद्यःस्थित असलेल्या दोन इमारती पाडण्यासाठी व त्यामध्ये दुकानाच्या मालकाबरोबर इमारती पाडण्या संबंधात त्यांची संमती घेणेबाबत व मंडळाच्या प्रस्तावा विषयी त्यांच्याशी चर्चा करण्यासाठी व त्याची लेखी संमती घेणेसाठी दुकानदारासमवेत अनेकवेळा बैठकी झाल्या परंतु दुकानदाराने इमारती पाडण्याविषयी लेखी संमती अद्याप न दिल्याने याविषया संबंधी कांही कार्यवाही होऊ शकली नाही व याविषयी दुकानदाराबरोबर बैठकी घेऊन त्यांची इमारती पाडण्या विषयी लेखी संमती घेणे प्रस्तावित योजनेचे नकशे,अंदाजपत्रके व आराखडे बनविणे व त्यास प्राधिकरणाची मंजूरी घेणे यास बराच वेळ लागेल म्हणून इमारती पाडून तेथे व्यापारीसंकुल बांधणे हा प्रस्ताव टप्पा क्र. २ मध्ये ठेवण्यात यावा (मुख्य रस्त्यालगतची व्यापारी संकुल योजना टप्पा क्र. २)व उर्वरीत मागील बाजुवरील जमिनीवर उच्च उत्पन्नगटासाठी प्लॅटची व दुकाने ही योजना राबविण्यासाठीचा प्रस्ताव टप्पा क्र. १ मध्ये सुरु करता येऊ शकेल. म्हणून उच्च उत्पन्न गटांच्या प्लॅटची योजना प्रस्तावीत करुन त्यासाठी १० टक्के अनामत रक्कमेस ठोस मागणी अजमाविण्यासाठी जाहिरात देण्यास व जर ठोस मागणी प्राप्त झाल्यास त्याप्रमाणे योजना राबविण्यासाठीची सदर बाब मंडळाच्या विचारार्थ व मान्येस्तव सादर केली आहे, असे मुख्य अधिकारी यांनी मंडळास माहिती दिली.या विषयाबाबत मंडळाच्या मा. सर्व सदस्यांनी सर्वानुमते सांगितले की, मुख्य रस्त्यालगत ( सध्यास्थित इमारती पाडुन त्याठिकाणी व्यापारीसंकुल बांधणे) व्यापारीसंकुल प्रस्तावित करण्याची योजना ही टप्पा क्रमांक २ मध्ये ठेवण्यात यावी. मुख्य रस्त्यालगतच्या मागील जमिनीवर उच्चउत्पन्न गटातील लोकांसाठी प्लॅटची योजना त्यामधील दुकानांसह टप्पा क्रमांक १

मध्ये प्रस्तावित करावी व त्यासाठी गाळयांच्या किंमतीच्या १० टक्के अनामत रक्कम घेऊन मागणी अजमाविण्यासाठी जाहिरात देऊन कार्यवाही करावी असेही मंडळाने सर्वानुमते सांगितले.

उपरोक्त प्रमाणेचर्चा झाल्यानंतर मंडळाने खालील प्रमाणे निर्णय घेतला की,

ठराव क्रमांक ७५०

सिटीएस क्र. २०७१९, गृहनिर्माणभवना जवळील औरंगाबाद येथील जमिनीवर टप्पा क्र. १ मध्ये (मुख्य रस्त्यालगतची प्रस्तावित व्यापारीसंकुल योजना क्र. २ सोडुन) उच्च उत्पन्न गटातील लोकांसाठी प्लॅटची योजना त्यामधील दुकानास राबविण्यात यावी व त्यासाठी जाहिरात देऊन १० टक्के अनामत रक्कमेसह मागणी अजमाविण्यात यावी.

विषय क्र.६ :- मुर्तिजापूर/औरंगाबाद येथील तात्पुरत्वी पाणीपुरवठा यंत्रणा चालविण्याचे काम कंत्राटीपध्दतीवर देणेबाबत.

या विषयीच्या बाब टिप्पणीबाबत मुख्य अधिकारी यांनी मंडळास माहिती दिली . मुर्तिजापूर येथील ६८८ गाळे अल्पउत्पन्नगट व ३४ गाळे मध्यम उत्पन्नगट योजना पुर्ण केली आहे व या योजनेस एकुण १० विंधन विहीरी खोदल्या. यापैकी ४ विधंनविहीरींवर हातपंप बसविण्यांत आलेले आहेत व ५ विहीरींमध्ये सबमर्सिबल पंप बसविण्यात येऊन सदर पंपाचे पाणी एका अंडरग्राऊंड १,५०,००० लिटर क्षमतेच्या पाण्याच्याटाकीमध्ये जमा करुन सदर पाणी वेगवेगळया वेळेनुसार मोनोब्लॅक पंपाच्या साहयाने गाळेधारकांना सोडण्यांत येते.परतु या योजनेस सध्या महानगरपालिकेने पाणीपुरवठा करण्यास असमर्थता दाखविलेली आहे. म्हणुन तुर्त विंधनविहरींमध्ये मंडळातर्फे पाणीपुरवठा गाळेधारकंना करण्यांत येत आहे.सदर विंधन विहीरींद्वारे पाणीपुरवठा करण्यासाठी मंडळाचे आस्थानेवरील पंपचालक उपलब्ध नाही ,त्यामुळे पाणीपुरवठा करण्यासाठी अडचण येत आहे.म्हणून उपरोक्त गाळयांना पाणीपुरवठा करण्याचे काम ठेका पध्दतीने एखाद्या एजन्सीला देणे मंडळाच्या दृष्टीने फायदेशीर होईल . त्यामध्ये पंप सुरु करणे,पाण्याची टाकी भरणे व वेगवेगळया वेळेनुसार गाळेधारकांना पाणीपुरवठा करणे इ. कामांचा समावेश असेल. सदर ठेकापध्दतीने काम निविदा मागवुन प्रस्तावित आहे व त्यासाठी सदर कामाचा खर्च हा गाळेधारकांकडुन प्रतिमाह रु.१००/- सर्व्हीस चार्जेस मधुन भागविता येऊ शकेल व यामधुनच ठेका पध्दतीने पाणीपुरवठयाचे काम दिल्यास तो खर्च देखील यातुन भागविता येऊ शकेल. करिता सदर बाब मंडळाच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर करण्यात आली आहे. याबाबत मंडळाने सर्वानुमते सांगितले की, मुर्तिजापूर औरंगाबाद येथील उपरोक्त गाळयांना पाणीपुरवठा करणे ही बाब अत्यंत महत्वाची असल्यामुळे गाळेधारकांना दैनंदिन

वेळेवर पाणीपुरवठा करण्याच्या दृष्टीने पाणीपुरवठयाचे काम ठेका पध्दतीने निविदा मागवुन देण्याचे मान्य केले.उपरोक्त चर्चेअंती मंडळाने सर्वानुमते खालील प्रेमाणे निर्णय घेतला की,

**ठराव क्र ७५१**

मुर्तिजापूर औरंगाबाद येथील ६८८ गाळे अल्प उत्पन्नगट व ३४ गाळे मध्यम उत्पन्न गट योजनेस पाणीपुरवठा यंत्रणा चालविण्याचे काम कंत्राटी पध्दतीवर ठेका पध्दतीने देण्यासाठी मंजूरी देण्यांत येत आहे व यासाठी निविदा मागवुन उपरोक्त पाणीपुरवठयाचे काम ठेका पध्दतीने देण्यासाठी कार्यवाही करण्यांत यावी. त्यावरील खर्च गाळेधारकांकडुन सेवाशुल्कामधुन भागविण्यांत यावा. स्थायी करणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी.

विषय क्र ७:- राष्ट्रीय झोपडपट्टी सुधारणा याजने अंतर्गत औरंगाबाद येथील घोषित झोपडपट्टीतील कामांच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

याविषयाच्या बाब टिप्पणीबाबत मुख्य अधिकारी यांनी मंडळास माहती दिली की,औरंगाबाद महानगरपालिकेने चिकलठाणा गांव व चिकलठाणा बुध्दवाडा या दोन घोषित झोपडपट्टयामध्ये राष्ट्रीय झोपडपट्टी सुधार कार्यक्रमा अंतर्गत फक्त रस्ते पुरविण्याच्या सुविधांसाठी रु. १२,१८,०३५ एवढया रकमेस प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी मंडळाकडे अंदाजपत्रक सादर केले आहे. निधीच्या तरतुदीच्या अधिन राहुन व बाब टिप्पणीत नमुद केलेल्या अटींच्या अधिन राहुन महानगरपालिकेने सादर केलेल्या रुपये १२,१८,०३५/- च्या प्रस्तावापैकी प्राधिकरणाने ठरवुन दिलेल्या मानकाप्रमाणे आर्थिक तरतुदीच्या दीडपटी पर्यन्त प्रशासकीय मान्यता देता येत असल्याने व सन २००२-०३ या आर्थिक वर्षात औरंगाबादसाठी रु. ६.०० लक्ष तरतुद असल्याने फक्त रु. ९,००,०००/- एवढया खर्चाच्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करता येऊ शकेल व मंजूरी प्रदान करण्याचे अधिकार विभागीय मंडळास असल्यामुळे सदर बाब मंडळाच्या विचारार्थ व निर्णयास्तव सादर केली आहे.याबाबत मंडळाचे सर्व मा. सदस्य यांनी सर्वानुमते सांगितले की, बाब टिप्पणीत नमुद केल्याप्रमाणे दोन झोपडपट्टीमधील रस्ते पुरविण्याच्या कामासाठी झोपडपट्टी योजना अंतर्गत महानगरपालिका औरंगाबादने सादर केलेल्या अंदाजपत्रकीय रक्कम रुयपये १२,१८,०३५/- च्या रक्कमेपैकी फक्त रु. ९,००,०००/- एवढया रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करणे करिता आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता करुन घेऊन बाब टिप्पणीत नमुद केलेल्या आठ अटींच्या अधिन राहुन निधीच्या उपलब्धतेनुसार व शासनाच्या नियमांच्या अधिन राहुन प्रशासकीय मान्यता देण्यात यावी.

उपरोक्त प्रमाणे चर्चा झाल्यानंतर मंडळाने निर्णय घेतला की,

ठराव क्रमांक ७५२

झोपडपट्टी सुधार कार्यक्रमा अंतर्गत औरंगाबाद येथील चिकलठाणा गांव व चिकलठाणा बुध्दवाडा या दोन घोषित झोपडपट्टीतील फक्त रस्ते पुरविणेच्या सुविधांच्या कामासाठी महानगरपालिका औरंगाबादने सादर केलेल्या रु. १२,१८,०३५/- च्या प्रस्तावांपैकी फक्त रुपये ९,००,०००/- एवढया रक्कमेस निधीच्या उपलब्धते नुसार बाब टिप्पणीत नमुद केलेल्या अटींच्या अधिन राहुन प्रशासकीय मान्यताप्रदान करण्यात येत आहे. सदर ठरावाच्या स्थायी करणाची वाट न पाहता अंमलबजाणीची कार्यवाही करण्यात यावी असाही मंडळाने निर्णय घेतला.

वरीलप्रमाणे पटलावरील विषय संपल्यानंतर मंडळाचे मा. सदस्य यांनी खालील प्रमाणे बैठकीत मुद्दे उपस्थित केले व त्यावर कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

१. मा. सदस्य श्री.इनामदार यांनी बैठकीत सांगितले की, ग्रामीण भागात मंडळाच्या योजना प्रमाणात राबविण्यासाठी,ग्रामीण निवारा योजना प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी डीआरडीए कडुन म्हाडाकडे देणेसाठी शासनाकडे तसा प्रस्ताव पाठविण्यांत यावा. म्हणजे म्हाडाला ग्रामीण भागात योजना राबविता येईल.याबाबत मुख्य अधिकारी यांनी सांगितले की याबाबत प्राधिकरणाकडे प्रस्ताव पाठविण्यांत आलेले असुन सदर प्रस्तावावर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, प्राधिकरण यांनी या योजनेमध्ये म्हाडाचा सहभाग फक्त तांत्रिक सल्ला देण्यापुरता राहील असे कळविले आहे. तसेच मंडळाच्या मा. सदस्यांनी ग्रामीण भागात ज्याज्या गांवात योजना राबविणे शक्य आहे, अशा गांवाची यादी दिल्यास त्याप्रमाणे अशा गांवाच्या ठिकाणी राष्ट्रीय गृहनिर्माण योजना प्रस्तावित करण्यासाठी कार्यवाही करण्यात येईल, असे मुख्य अधिकारी यांनी बैठकीत प्रतिपादन केले.

२. मंडळाचे मा. सदस्य श्री. सावे यांनी बोरी ता. जिंतुर येथील योजनेच्या कामाच्या प्रगतीबाबत विचारणा केली.मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, सदर योजनेतील गाळयांचे खोद काम चालु असुन तेथे एक शेड उभारली आहे. मा.श्री. सावे सदस्य यांनी प्रतिपादन केले की, सदर योजनेचे काम सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांनी वेगाने केले नाही तर कामाची भरीव प्रगती एक महिन्याच्या आत दिसुन आली नाही तर त्यांना दिलेले काम अंतिम नोटीस देऊन रद्द करावे. याविषयी मंडळाचे सर्व मा. सदस्य यांनी सांगितले की, एक महिन्याच्या आत कामाची भरीव प्रगती दिसुन आली नाही तर ठेकेदारांना दिलेले काम रद्द करावे व त्याचे नांव ब्लॅकलिष्टमध्ये टाकण्यासाठी मुख्य अधिकारी यांनी कारवाई करावी असे बैठकीत ठरले.

३. मंडळाचे मा. सदस्य श्री. इनामदार ,मा.श्री. वाघचौरे यांनी सांगितले की, वॅम्बे योजने अंतर्गत जिल्हास्तरीय कमिटीच्या बैठकीस त्या त्या जिल्हयाच्या सदस्यांनी मा.सभापती औरंगाबाद मंडळ यांचे वतीने उपस्थित राहणेसाठी मा. सभापती, औरंगाबाद मंडळ यांची परवानगी मुख्य अधिकारी यांनी घ्यावी

व तसे वॅम्बेच्या जिल्हास्तरीय कमीटीच्या अध्यक्षांना कळविण्यात यावे म्हणजे यापुढे वॅम्बेच्या बैठकीत त्या त्या जिल्हयाचे सदस्य जावु शकतील.मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, उपरोक्त बाबतीत मा. सभापती औरंगाबाद मंडळ यांचे समवेत चर्चा करुन त्यांचे परवानगीने पुढील कार्यवाही करण्यांत येईल.

४. मंडळाचे सदस्य मा.श्री. इनामदार यांनी बेठकीस सांगितले की, लातुर विभागात काम करणारे कर्मचारी/अधिकारी मंडळाचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपस्थित नसतात,कार्यालयात येणाऱ्या जनतेला मंडळाच्या योजनांची किंवा त्यांचे कार्यालयात असलेल्या कामाबाबत व्यवस्थीत माहिती देत नाही व तसेच मंडळाचे सदस्य यांनाही मंडळाच्या योजनांविषयी माहिती मागितल्यास अशी माहिती देत नाही. त्यामुळे जनतेची कामे खोळंबत आहेत व मंडळाची कामेही वेळेवर होत नाहीत . तरी लातुर विभागातील कर्मचारी अधिकारी यांना सूचना द्याव्यात की, त्यांनी कार्यालयीन वेळेत कार्यालयात/साईटवर हजर रहावे, जनतेला मंडळाच्या कामाची माहिती द्यावी,जनतेची कामे विनाविलंब करावी व मंडळाच्या सदस्यांनी मागितलेली माहिती पुरविण्यांत यावी,अशा सूचना मुख्य अधिकारी यांनी सर्व संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांना निर्गमीत कराव्यात. याबाबत मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, याबाबत लातूर विभागीय कार्यालयातील सर्व संबंधीत अधिकारी कर्मचारी यांना योग्य त्या सूचना त्वरीत देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

५. मंडळाचे सदस्य मा.श्री. डॉ.शिंदे यांनी सांगितले की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत झोपडपट्टी सुधार योजने अंतर्गत मागील वर्षात व चालु वर्षात किती कामे झाली व त्यावर किती खर्च झाला याची माहिती त्यांना मिळावी म्हणून बैठकीत सांगितले होते. परंतु दिनांक ७/३/२००३ पर्यन्त सदर माहिती संबंधीत अधिकाऱ्यांकडुन मिळाली नसल्याबाबत त्यांनी खेद व्यक्त केला. म्हणुन मा.शिंदे सदस्य यांनी सांगितले की, मंडळाने सदस्यांनी मंडळाशी संबंधीत माहिती मागविल्यास ती विनाविलंब उपलब्ध करुन देण्यासाठी सर्व संबंधीत अधिकाऱ्यांना सूचना द्याव्यात.तसेच मंडळाच्या बैठकीत जे ठराव/निर्णय घेतले जातात त्यावर तात्काळ कार्यवाही करण्याची वठरावाची अंमलबजवणी करण्याची जबाबदारीही संबंधीत अधिकारी यांची आहे. मंडळाच्या मा.सदस्यांनी मागितलेली माहिती विनाविलंब मा. सदस्यांना पुरविणेसाठी व तसेच मंडळाच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयावर मंडळस्तरावर आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी संबंधीत अधिकारी यांना सूचना देण्यात येतील,असे मुख्य अधिकरी औरंगाबाद मंडळ यांनी सांगितले.

६. मा. डॉ.शिंदे सदस्य यांनी बैठकीत सांगितले की, मौजे देवळाई येथील गृहनिर्माण योजना व गृहनिर्माण भवनाजवळील मोकळया भूखंडावर व्यापारी संकुल राबविण्याच्या योजनेस विलंब होत आहे म्हणून यादोन्ही योजना राबविण्याच्या कामास गती देण्यात यावी.मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, देवळाई येथील गृहनिर्माण योजना बाबत जमिनीचे रहिवाशी झोनमध्ये समाविष्ट होणेबाबत दररोज मंत्रालयात संबंधीत विभागाशी संपर्क साधुन पाठपुरावा करण्यात येत आहे. थोडयाच दिवसात जमिनीची अंतिम अधिसुचना प्रसिध्द होण्याच्या मार्गावर आहे. देवळाई जमिनीची बाब ही मंत्रालयात शासनस्तरावर प्रलंबीत आहे.

७. मंडळाचे सदस्य मा.श्री. पाटील व मा.श्री. उपासे यांनी विचारणा केली की. क्रांती चौक येथील खाजगी जमिन अंदाजे २१ एकर घेण्याबाबत मंडळाचे मागील बैठकीत चर्चा होऊन त्याबाबत जमिनीची पाहणी करुन पुढील कार्यवाही करणेबाबत ठरले होते.त्यानुसार त्यामध्ये काय कार्यवाही झालेली आहे, याबाबत मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, सदर जमिनीवर अतिक्रमणे झालेली आहे.त्यामुळे तेथे जमिन शिल्लक नाही.म्हणून सदर जमिन घेण्यास अडचण येत आहे.यावर मंडळाचे सदस्य मा. श्री. वायचौरे ,मा.श्री. सावे व मा.श्री.इनामदार यांनी सांगितले की, क्रांती चौक येथील एकुण २९ एकर जमिनीपैकी १९ एकर जमिनीवर अतिक्रमण व शासकीय कार्यालये आहेत व उर्वरीत १० एकर जमिन मोकळी आहे मंडळाचे सदस्य श्री. उपासे यांनी असे सुचविले की, सदर जमिनीची पाहणी करावी व त्या पाहणीचे वेळी त्यांचेसह मुख्यालयाचे सदस्यही सोबत घ्यावेत असे सुचविले . शेवटी मंडळाच्या सर्व सदस्यांनी सर्वानुमते सांगितले की, सदर जमिनीची संयुक्त पाहणी मंडळाच्या पुढील बैठकीच्या वेळी करण्यांत यावी. यावर मुख्य अधिकारी यांनी सांगितले की. मंडळाच्या पुढील बैठकीच्या वेळी सदर जमिनीची पाहाणी मा. सभापती औरंगाबाद मंडळ,मंडळाचे सर्व सदस्य,मुख्य अधिकारी व कार्यकारी अभियंता यांचे समवेत करण्याची कार्यवाही केली जाईल.

८. मंडळाचे. मा. सदस्य श्री. उपासे यांनी सांगितले की, श्री. विलासराव देशमुख, माजी आमदार-खासदार सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करुन सदर संस्थेच्या सभासदांसाठी औरंगाबाद येथे घरे बांधुन देण्यासाठी मंडळाकडे सदर गृहनिर्माण संस्थचे अध्यक्ष श्री. पंडीतराव दौंड यांनी मंडळाकडे विनंती केली आहे.त्यानुसार मंडळातर्फे अशा संस्थेस सभासदांसाठी घरे बांधुन देण्यासाठी त्यांना मंडळाचा एखादा भूखंड औरंगाबाद येथे देता येईल काय अशी विचारणा केली या विषयी मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, सदर बाब नियमानुसार तपासुन त्याबाबत मंडळाच्या आगामी बैठकीत माहिती सादर करण्यात येईल.

९. मंडळाने सर्वानुमते सांगितले की, मंडळाची बैठक दुपारी ३.०० वा ऐवजी ११.०० वाजता ठेवण्यांत यावी.

उपरोक्त प्रमाणे पटलावरील विषय संपल्यानंतर उपस्थितांचे आभार मानुन बैठकीचे अध्यक्ष यांचे परवानगीने बैठक संपल्याचे जाहीर केले.